Vol 2 Issue 7 April 2013 ISSN No : 2249-894X

Monthly Multidisciplinary Research Journal

# Review Of Research Journal

Chief Editors

**Ashok Yakkaldevi**
**A R Burla College, India**

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Kamani Perera
Regional Centre For Strategic Studies, Sri Lanka

**Welcome to Review Of Research**

**RNI MAHMUL/2011/38595** **ISSN No.2249-894X**

Review Of Research Journal is a multidisciplinary research journal, published monthly in English, Hindi & Marathi Language. All research papers submitted to the journal will be double - blind peer reviewed referred by members of the editorial Board readers will include investigator in universities, research institutes government and industry with research interest in the general subjects.

## Regional Editor

Manichander Thammishetty
Ph.d Research Scholar, Faculty of Education IASE, Osmania University, Hyderabad.

## *Advisory Board*

Kamani Perera
Regional Centre For Strategic Studies, Sri Lanka

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Fabricio Moraes de AlmeidaFederal University of Rondonia, Brazil

Anna Maria Constantinovici
AL. I. Cuza University, Romania

Romona Mihaila
Spiru Haret University, Romania

Delia Serbescu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Xiaohua Yang
University of San Francisco, San Francisco

Karina Xavier
Massachusetts Institute of Technology (MIT), USA

May Hongmei Gao
Kennesaw State University, USA

Marc Fetscherin
Rollins College, USA

Liu Chen
Beijing Foreign Studies University, China

Mabel Miao
Center for China and Globalization, China

Ruth Wolf
University Walla, Israel

Jie Hao
University of Sydney, Australia

Pei-Shan Kao Andrea
University of Essex, United Kingdom

Loredana Bosca
Spiru Haret University, Romania

Ilie Pintea
Spiru Haret University, Romania

Mahdi Moharrampour
Islamic Azad University buinzahra Branch, Qazvin, Iran

Titus Pop
PhD, Partium Christian University, Oradea,
Romania

J. K. VIJAYAKUMAR
King Abdullah University of Science & Technology,Saudi Arabia.

George - Calin SERITAN
Postdoctoral Researcher
Faculty of Philosophy and Socio-Political Sciences
Al. I. Cuza University, Iasi

REZA KAFIPOUR
Shiraz University of Medical Sciences
Shiraz, Iran

Rajendra Shendge
Director, B.C.U.D. Solapur University, Solapur

Nimita Khanna
Director, Isara Institute of Management, New Delhi

Salve R. N.
Department of Sociology, Shivaji University, Kolhapur

P. Malyadri
Government Degree College, Tandur, A.P.

S. D. Sindkhedkar
PSGVP Mandal's Arts, Science and Commerce College, Shahada [ M.S. ]

Anurag Misra
DBS College, Kanpur

C. D. Balaji
Panimalar Engineering College, Chennai

Bhavana vivek patole
PhD, Elphinstone college mumbai-32

Awadhesh Kumar Shirotriya
Secretary, Play India Play (Trust),Meerut (U.P.)

Govind P. Shinde
Bharati Vidyapeeth School of Distance Education Center, Navi Mumbai

Sonal Singh
Vikram University, Ujjain

Jayashree Patil-Dake
MBA Department of Badruka College Commerce and Arts Post Graduate Centre (BCCAPGC),Kachiguda, Hyderabad

Maj. Dr. S. Bakhtiar Choudhary
Director,Hyderabad AP India.

AR. SARAVANAKUMARALAGAPPA UNIVERSITY, KARAIKUDI,TN

V.MAHALAKSHMI
Dean, Panimalar Engineering College

S.KANNAN
Ph.D , Annamalai University

Kanwar Dinesh Singh
Dept.English, Government Postgraduate College , solan

More.........

**Address:-Ashok Yakkaldevi 258/34, Raviwar Peth, Solapur - 413 005 Maharashtra, India**
**Cell : 9595 359 435, Ph No: 02172372010 Email: ayisrj@yahoo.in Website: www.ror.isrj.org**

Review Of Research
Vol. 2, Issue. 7, April. 2013
ISSN:-2249-894X
Available online at www.ror.isrj.net

ORIGINAL ARTICLE

# पेशवेकालीन चलन

**प्राचार्य डॉ. बी.व्ही. चौधरी**

वसुंधरा कला महविद्यालय, जुळे सोलापूर, सोलापूर.

**पेशवेकालीन चलन :**

पेशव्यांच्या काळातील नाण्यांचा इतिहास म्हणजे एकंदरीत नाणेपध्दतीच्या ऱ्हासाचा इतिहास. त्याचप्रमाणे तो भेसळीचा व अधोगतीचा इतिहास होता. खाजगी व्यक्तीना नाणी पाडण्याचे परवाने देण्याचे प्रभाव अधिकच वाढले. बेकायदेशीरपणे नाणे पाडणे सुद्धा चालू झाले. कायदेशीर व बेकायदेशीर अशा दोन्ही प्रकारच्या टाकसाळीतून प्रमाणभूत नाणी न पाडता त्यास फरक होऊ लागले व अशुद्ध प्रतीची व कमी दर्जाच्या कसबाची नाणी तयार होऊ लागली. पेशवे सरकार टाकसाळीतून चालणाऱ्या गैरव्यवहारांना आळा घालण्याचा प्रयत्न करून सुद्धा टाकसाळीवर नियंत्रण राखू शकले नाही. शिवाजी महाराजांनी सुरू केलेले चलनाचे परिणाम 'होन' याचा त्याग करण्यात येऊन प्रमाणभूत नाणे म्हणून त्या जागी रूपया या नाण्याची निवड झाली. पेशव्यांची स्वतःची अशी नाव घेण्यासारखी नाणेपद्धती नसल्यामुळे व त्यांची चांदीची चलनात प्रचलित असलेल्या नाण्यांची केवळ नक्कल असल्याने त्यांना महाराष्ट्राबाहेरून येणाऱ्या इतर राज्यातील नाणी केवळ नक्कल असल्याने त्यांना महाराष्ट्राबाहेरून येणाऱ्या इतर राज्यातील नाणी स्वीकारावी लागत असत. सततच्या चलनातील वापरामुळे ती नाणी झिजलेली असली म्हणजे त्यांची किंमत कमी होई आणि त्यामुळे ती स्वीकारण्याआधी प्रत्येक वेळी त्यांचा विनिमय दर निश्चित करून घ्यावा लागे. वारंवार झालेल्या हस्तांतरामुळे वापरून झिजलेल्या नाण्यांच्या कमी झालेल्या किंमतीची भरपाई मागावी लागत असे. समकालीन उल्लेखावरून महाराष्ट्रात त्याकाळी चलनात असलेल्या पण इतरत्र टाकसाळीत पडलेल्या व इतर राज्यांनी प्रचलित केलेल्या नाण्यांच्या मोठया संख्येचा अंदाज करता येतो. अशा नाण्यामध्ये रहिमतपुरी, मलकापुरी, चांदवड, चिंचवड, सुरती, इंग्लिश, बागलकोटी, महमदशाही, जुन्या पंचमेल, जुनी औरंगाबाद अमदाबादी जातुरी अजमेर, औरंगाबाद नवी गजीकाटे अकार्ट, मिटे आतीचे, जुने मल्हारशाही, हाली सिवन कोरे–अरशी चरतासिंगी, सारोळी, त्रिशुली, गजापुरी, बावडी, भुंडे, मुंबई, भातवडी, साहू–सिवळा, वाई–शिक्का, अर्काट–फुलचरी, मोहरा आमदशाही, महमदशाही मुहर अकार्ट–गंजीकोट, जोगिनीवज्र, अलमगिरी, जुना शिवराई मिरजी–मलकापुरी, नीळकंठी, इटाव, भडोची, कल्याण चाळ, दौलताबादी हुकेरी, तळेगावी, पुणे–चलन, पुणे–सिक्का, कल्याण–सिक्का, जरी पटका वगैरे नाणी होती.1 तरीही पेशव्यांच्या काळात महाराष्ट्रातील चलनात असलेल्या नाण्यांची यादी येथेच पूर्ण होत नाही. रूपयांच्या नाण्यांची अशी गोंधळ निर्माण करणारी सरमिसळ जरी असली तरी त्यापैकी फारच थोडी नाणी पेशव्यांच्या टाकसाळीत पाडली जात होती. या नाण्याचे व्यवस्थित वर्गीकरण करणे, त्यांची ओळख पटवणे व त्यांची बरोबर किंमत ठरविणे ही कामे सोपी नाहीत. त्या नाण्यापैकी पुष्कळशी नाणी त्यांच्या टाकसाळीच्या नावाने ओळखली जात. उदा. रहिमपुरी, मलकापुरी, चांदवड, बागलकोटी इत्यादी काही नाणी त्यांच्या राज्यकर्त्यांच्या नावाने ओळखली जात. उदा. महंमदशाही, शिवराई, मल्हारशाही ही नाणी अनुक्रमे महंमद आदिलशहा, शिवाजी महाराज आणि मल्हारराव होळकर यांच्या नावाने ओळखली जात. काही नाण्यांची नावे त्यांच्या मुख्य बाजूवरील चिन्हांवरून पडलेली होती. 'त्रिशुली' नाण्यावर त्रिशुलाचे चिन्ह असे. 'फरशी' या नाण्याच्या मुख्य बाजूस फरशी कुऱ्हाडीचे चिन्ह असे आणि तुऱ्याचा रूपया या नाण्यावर पिसाचे चिन्ह असे. चलनातील काही नाणी सरकारी चलन म्हणून जाहीर केली जात असत व सरकारी देणी फक्त त्या नाण्यांच्या रूपानेच स्वीकारली जात. अशी नाणी सरकारी चलन म्हणून ओळखली जात. काही नाणी ती ज्या भागात प्रचारात असत तेथील नावाने ती ओळखली जात. ती म्हणजे वसई–चाल, पुणे–चाल आणि कल्याण–चाल अशा सारखी होत. 'दाणे–चलनी' रूपया हे धान्यबाजारातील चलनी नाणे होते. 'पोतेचाल' नावाची चलनी नाणी सरकारी खजिन्यात स्वीकारली जाणारी होती आणि नाण्यामधील धातूचे प्रमाण व नाण्याचा नमुना पेशवे सरकारने ठरवून दिलेला असे.

काही नाण्यांना कोरीव नाणी असे खास नाव होते. उदा. छापी–चांदवड हे नाणे चांदवड येथील टाकसाळीत

Title: पेशवेकालीन चलन
Source: Review of Research [2249-894X] प्राचार्य डॉ. बी.व्ही. चौधरी yr:2013 vol:2 iss:7

पाडलेले व त्यावर कोरीव काम केलेले असे होते. वारंवार हाताळणी केल्यामुळे या नाण्यावरील छापलेला मजकूर पुसट होऊन निघून जात असे. अशी झिजलेली नाणी अथवा अर्धवट झिजलेली नाणी बाजारात कमी–किंमतीची ठरत असत व त्यांचा विनिमयाचा दर कमी होई. यामुळे असे दिसून येते की, काही वेळा अशा झिजवट नाण्यावरील मजकूर पुन्हा कोरून अगर छापवून घेतला जाई. त्यासाठी त्यात थोडासा धातू मिसळला जाई व या कामासाठी काही पैशाची आकारणी केली जात असे. यास 'बट्टा' अगर 'बटा' असे म्हणत.[2] जुनी–औरंगाबादी व नवी–औरंगाबादी या नाण्यावरून असेच सुचित होते की लोक जुनी झिजलेली नाणी व अगदी नवी नाणी यात भेद करत असत आणि यामुळेच जुनी नाणी पुन्हा नव्या नाण्याबरोबरीच्या किंमतीच्या करण्यासाठी प्रयत्न होत असत.

काही नाण्यांची नावे दोन–दोन टाकसाळींच्या नावावरून पडलेली असत असे दिसते. उदा. अर्काट–फुलचरी, अर्काट–गंजीकोट, मिरजी–मलकापुरी, ग्वाल्हेर–गंजीकोट इत्यादी अर्काट–फुलचरी आणि अर्काट–गंजीकोट यासारख्या नावावरून असे दिसते की, ती नाणी या ठिकाणच्या टाकसाळीतून तयार केली जात असत. 'अर्काट' रूपयाचे नाणे एका ब्रिटिश टाकसाळीत पाडले जात असे तर फुलचरी हे नाणे बहुधा फ्रेंचानी पाँडेचरीच्या टाकसाळीत पाडलेले होते. ही नाणी अगदी प्रमाणभूत मानली जात होती. ही प्रमाणित नाणी कोरोमॅडेलच्या किनाऱ्यावरील भागातून आलेली असल्याने त्याचे निदर्शक म्हणून बहुधा त्या भागातील टाकसाळीच्या जोड नावाने ओळखली जात. दुसरे असे की ही नाणी कारागिरीच्या दृष्टीने चांगल्या दर्जाची असल्याने पेशव्यांनी आपल्या धारवाड, नाशिक व चांदवड यासारख्या टाकसाळींना त्यांच्या नमुन्याप्रमाणे नाणी पाडण्यासाठी हुकूम दिलेले असत. धारवाडच्या टाकसाळीला अर्काट–फुलचरी येथील नाण्यांच्या धर्तीवर नाणी पाडण्याविषयी सूचना दिलेल्या होत्या तर चांदवड येथील टाकसाळीला 'गंजीकोट' टाकसाळीतील नाण्यांच्या धर्तीवर नाणी पाडण्याविषयी सूचना दिलेल्या होत्या तर चांदवड येथील टाकसाळीला 'गंजीकोट' टाकसाळीतील नाण्यांच्या नमुन्याची नाणी पाडण्याविषयी सूचना होत्या. काही नाणी शिक्का अगर सिका या नावांनी ओळखली जाणारी होती. जसे हाली–सिक्का, शाहू–सिक्का, बाई–सिक्का, पुणे–सिक्का व कल्याण सिक्का 'सिक्का' हा शब्द बहुतांशी टाकसाळ अशा अर्थाने वापरला जाई. या रितीने 'वाई–सिक्का' याचा अर्थ वाई येथील टाकसाळीत पाडलेले नाणे असा होतो. 'पुणे–सिक्का' हे नाणे पुणे येथे पाडून चलनात आणलेले असे. 'शाहू–सिक्का' ही नाणी राजा शाहूच्या टाकसाळीत पाडलेली असत. हाली सिक्का म्हणजे बहुधा नवी नाणी असा अर्थ होई किंवा त्याचा अर्थ 'अधिक किंमतीची नाणी' असाही होत असे. जरी पटका ही नाणी मुख्यतः नाशिक येथील टाकसाळीत पाडलेली असत व बहुधा नागपूरच्या टाकसाळीत देखील पाडलेली असत.

शेवटच्या मुघल बादशहाप्रमाणेच पेशवे सरकारनेही खाजगी व्यक्तींना नाणी पाडण्याचे परवाने देण्याचे सदोष धोरण स्वीकारल्यामुळे व त्या बाबतीतील कडक नियंत्रणे ठेवण्यासंबंधी त्यांच्या असमर्थतेमुळे नाणे–पद्धतीचा झपाटयाने अंधःपात होत गेला. काही खाजगी टाकसाळींनी हलक्या प्रतीची नाणी पाडली. त्यामुळे बाजारात त्यांची किंमत बरीचशी घटत गेली व त्याचा विनिमयाचा दरही कमी होत गेला. तेव्हा लोकांनी अशा नाण्यांची किंमत अपेक्षित दर्जापर्यंत वाढवण्यासाठी अनेक प्रकारचे प्रयत्न सुरू केले. त्यापैकी एक म्हणजे झिजलेल्या नाण्यामध्ये वजनातील फरक भरून काढण्यासाठी धातू मिसळणे हा प्रकार होता. दुसरी पद्धत म्हणजे अशी नाणी पूर्णपणे वितळवून त्यापासून प्रसिद्ध टाकसाळीतील नाण्यांच्या नमुन्याप्रमाणे नवीन नाणी पाडणे ही होती.[3]

### *पेशवेकालीन चलनपध्दतीची वैशिष्टये :*

1)शिवाजी महाराजांनी सुरू केलेल्या 'होन' नाण्याऐवजी 'रूपया' या नाण्याची पेशव्यांनी व्यवहारासाठी निवड केली.
2)पेशव्यांची निश्चित नाणे पद्धत नसल्याने त्यांची चांदीची नाणी अर्काट ते दिल्ली पर्यंतच्या भागात फिरत. त्यामुळे महाराष्ट्राबाहेरून येणारी नाणी स्वीकारावी लागत.
3)सततच्या चलनामुळे वापरलेली नाणी झिजत असत. त्यामुळे त्यांची किंमत कमी होत असे. परिणामी असे नाणे स्वीकारण्यापूर्वी प्रत्येक वेळी विनिमयाचा दर ठरवून घ्यावा लागत असे.
4)इतर टाकसाळीतील नाणी प्रचारात होती. ती बहुधा टाकसाळीच्या नावावरूनच ओळखली जात असत. उदा.रहिमतपुरी, मलकापुरी, सुरती, बागलकोटी, गंजीकोटे इ.
5)काही नाणी वैशिष्टयपूर्ण असत. उदा. 'त्रिशुली' नाणे यावर एका बाजूस त्रिशुलाचे चित्र असे. 'फरशी' नाण्यावर कुऱ्हाडीचे 'परशु' चे चित्र असे. 'तुऱ्याच्या रूपयांवर पिसाचे चिन्ह' असे.
6)'दाणे चलनी' हे रूपयाचे नाणे धान्यबाजारात चालत असे.
7)'पोतेचाल' नाणे सरकारी खजिन्यात स्वीकारले जात असत.
8)काही नाण्यांना कोरीव नाणी असे नाव होते. उदा. छापील चांदवड.
9)झिजलेल्या नाण्यात वजावटीसाठी धातू मिसळला जाई. त्याला 'बट्टा' म्हणत.
10)काही नाण्यांची नावे दोन–दोन टाकसाळींच्या नावावरून पडलेली असत. उदा. अर्काट–फुलचरी, अर्काट–गंजीकोट इ.

पेशव्यांनी खाजगी व्यक्तींना नाणी पाडण्याचे परवाने देण्याचे सदोष धोरण स्वीकारल्याने चलनव्यवस्थेमध्ये नवी

जुनी, अस्सल–बनावट, खरी–खोटी अशा नाण्यांचा गोंधळ उडाला. खाजगी टाकसाळींनी हलक्या प्रतीची नाणी पाडली. त्यामुळे बाजारात त्याची किंमत घटत गेली. विनिमयाचा दरही कमी होत गेला. नाण्याची अपेक्षित किंमत येण्यासाठी शासनाकडून प्रयत्न सुरू झाले. दोन प्रकारे नाणी सुधारण्याचे प्रयत्न झाले. त्यापैकी एक म्हणजे झिजलेल्या नाण्यांमध्ये वजनातील फरक भरून काढण्यासाठी धातू मिसळणे हा प्रकार होता. दुसरी पध्दत म्हणजे अशी नाणी पूर्णपणे वितळवून त्यापासून प्रसिध्द टाकसाळीतील नाण्याच्या नमुन्याप्रमाणे नवीच नाणी पाडणे ही होती. अशा प्रकारे नाण्यामध्ये सुधारणा करण्याच्या प्रयत्नाबद्दल दोन उदाहरणे देता येतील ती खालीलप्रमाणे –

1) 1789 साली रहिमतपुरी रूपयांची नाणी वितळवून त्यापासून चांदवडी रूपयांची नाणी पाडली. त्यावेळी प्रत्येक रूपयामागे रू. 0–4–0 अशी मजुरी घेऊन पाडली जात असे. तसेच
2) 1799 साली काही चांदवडी रूपयांची नाणी वितळवून त्यापासून दर शेकडा रू. 15–0–0 (पंधरा) रू. शेकडा दर देण्यात आला.[4]

असे लक्षात येते की, वेगवेगळया चांदीच्या रूपयाचे प्रमाणित वजन वेगवेगळे असे. चांदीच्या रूपयाचे प्रमाणित वजन 180 ग्रेन म्हणजे 11 मासे 2 गुंजा एवढे असे. भातवडी रूपयांचे नाणे 271.3 ग्रेन वजनाचे होते त्याची शुध्दता 149. 031 ग्रेन इतकी असे. फारशी रूपया 175 ग्रेन वजनाचा व 164.4 ग्रेन शुध्दतेचा असे. रूपयाच्या लहान भागाची नाणी म्हणजे साधारणतः अधेली (चांदीचे नाणे) व पावली (चांदीचे नाणे) आदी पैसा (तांब्याचे नाणे) ही होती. रूपयाची नाणी सोन्याच्या नाण्यात बदलून घेण्यासाठी विनिमयाचा दर साधारणपणे 16.1 असा होता.[5]

### *पेशव्यांच्या काळातील सोन्याची नाणी :*

यामध्ये मोहोर, अहमदाबादी, पुणेरी, औरंगाबादी, शेठशाही, तळेगावी, बऱ्हाणपुरी, अहमदशाही, सुरती, बनारसी, कुरा, जहानबाद, मछली बंदर, दिल्ली, पटनी व लोहारी अशा मोहरांचा समावेश होत असे. या मोहरांची नावे अशी – पंचपेठ, गंजीकोट, वज्रजोगणी, लातुरी, अजमेरी, महमदशाही, दरसानी इ. एका सोन्याच्या मोहराची किंमत 15 ते 15.5 चांदीच्या नाण्याइतकी असे. काही टाकसाळीमध्ये मोहरचे वजन 3 / 4 तोळा इतकेसुध्दा असे.

दुसरे सोन्याचे नाणे म्हणजे 'होन' होनाचे अनेक प्रकार असत. उदा. एलोरी, हैद्राबादी, संगिरी, हरपनहकळी, धारवाडी, नागर–पट्टणी इत्यादी एका होनची किंमत साधारणतः 3 चांदीचे रूपये असे. होनचे वजन तीन मासे असे. काही होनमध्ये सोन्या–चांदीचे मिश्रण असे.

तिसरे सोन्याचे नाणे म्हणजे 'पुतळी' होय. याचे वजनही एक 'तोळा' असे व विनिमयामध्ये एका पुतळीची किंमत सव्वासोळा रूपये ते सतरा रूपये असे. पेशव्यांनी पाडलेल्या पुतळीवर 'श्री गणपती' व 'श्री पंतप्रधान' असे शिक्के उठविलेले असत.

***चांदीची नाणी :*** चांदीच्या नाण्यांची यादी खूप मोठी त्यापैकी काही नावे अशी – रहिमतपुरी, मलकापुरी, चांदवड, मिरजी, अर्काट, पन्हाळी, इटावा, बेलापुरी, सारोळी, नागतुरा, शाहु शिक्का, अलमगिरी, दाणेचलनी, पुणे चलनी, हापशी चलनी इ.

***तांब्याची नाणी :*** तांब्याच्या नाण्यामध्ये शिवराई पैसा अलमगिरी पैसा, ढब्बू पैसा यांचा समावेश असे. यांच्या वजनामध्येही फरक असे. उदा. शिवराई पैशाचे वजन 9 1 / 4 मासा, अलमगिरी पैशाचे वजन 13 1 / 4 मासा ढब्बू पैशाचे वजन 18 1 / 2 मासा असे.

पेशवेकालीन चलनी नाण्याचे कोष्टक असे.
3 रूके = 1 पैसा (रूके = पूर्वीची पै)
4 पैसे = 1 आणा 4 आणे = 1 टका.6

### *विनिमयाचा दर :*

| | |
|---|---|
| 74 शिवराई तांब्याची नाणी | = 1 चांदीचे नाणे किंवा |
| 80 तांब्याची नाणी | = 1 चांदीचे नाणे |

म्हणजे तांबे व चांदी यांचे प्रमाण याप्रमाणे असे –

74 : 1 किंवा 80 : 1

| | |
|---|---|
| त्याचप्रमाणे चांदी 15 | = 1 सोन्याचे नाणे |
| तांब्याचे नाणे 1110 | = 1 सोन्याचे नाणे किंवा |
| तांब्याचे नाणे 1200 | = 1 सोन्याचे नाणे |

पेशवेकाळात चलन अदलाबदलीचे दरसोबतच्या पत्रावरून लक्षात येईल.

वरील विवेचनावरून पेशवेकालीन चलन व्यवस्था व त्यांचे प्रकार, त्यांची नावे व विनिमयाचा दर इत्यादी माहिती मिळते[7]

प्रस्तुत पत्रावरून पेशवेकालीन चलन अदलाबदलीचे दर लक्षात येतात.

राजश्री जनार्दन बलाल स्वामी गोसावी यासी विनंती उपरी. राजश्री जिवाजी गणेश यांजकडील मोहराचा मजकूर विस्तारे लिहिला तो कळला. पुण्यात जुन्या मोहरा पावणेपंधरा येक आणा प्रमाणे भाव आहे. रदबदलीमुळे तीन आणे नफा देऊन पंधरा प्रो घेत होता. त्यास ते म्हणतात की भावाप्रमाणे मोहरा घ्याव्या तेव्हा मग मोहरा घ्यावयाची बदल खावंदापासी कशास करावी? भावाप्राो मोहरा घ्याव्या. तेव्हा रूपयेच का न घ्यावे? याप्राो रदबदली करून बोलतात याची आज्ञा येईल त्याप्रमोण वर्तणूक करून म्हणून तुम्ही लिहिले ते कलले. अशास यांजकडील भरणा मोठास अवघड जहाला आहे. पुन्हा पुन्हा याचे जाबसाल लिहिले आहेत तरी अद्यापि ताल्यावर गोष्ट येत नाही. मग भरणा कधी होणार आहे? या निकडीच्या प्रसंगात कावादावा करून चवल पावला अधिक आगतन आम्हावर साधावा आणि आपण बोलल्याप्रमाणे आपला मुदा फैसला करून घ्यावा उचितच आहे. असो तुम्हाकडे लोकाच्या वराता केल्या आहेत. त्याप्रमाणे त्याचे पदरी यैवज पडून सत्वर तयार होऊन आले पाहिजे. याजकरिता मारनिले आग्रह करून सवापंधरानी मोहरा देत आहेत. त्या घ्यावयाचा करार केल्या आहेत. त्या सवा पंधरा प्रमाणे चालीस हजाराच्या मोहरा घेणे. वराता प्रमाणे लोकाचे पदरी ऐवज घालून जलदीने इकडे येऊन पोहचत ती गोष्ट करणे.[8]

### *सावकार आणि चलन बदलीचे व्यवहार :*

सावकार फक्त कर्ज देणारे धनको नव्हते तर त्यांची इतर अनेक प्रकारचे व्यापार होते. उदा. सराफाचा व्यवसाय, जमिनदारी, दलाली, व्यापार दलाल, व्यापारी, सोनार इ. शिवाय चलन बदलून देण्याचा अत्यंत किफायतशीर व्यवहार ते करीत होते. त्यात त्यांना बराच फायदा होता.

सरकारी टाकसाळीशिवाय अत्यंत जुजी औपचारिकतेने खाजगी टाकसाळी चालविल्या जात होत्या. त्याचा परिणाम म्हणून विविध स्वरूपाची नाणी व्यवहारात प्रचलित होती. त्या विविध नाण्यांची मूल्य निर्धारण करण्यासाठी विविध प्रकारच्या पध्दती निश्चित केलेल्या होत्या. सावकारांनी आपल्या ग्राहकांना पाहिजे तेव्हा नाण्याचे मूल्य ठरवून देण्याच्या व चलन बदलून देण्याची व्यवस्था केलेली होती. ज्या सावकारांकडे अधिक कामे असत ते या कामासाठी सराफाची नेमणूक करीत होते. सराफाकडे विविध प्रकारे नाणी देण्यात येत. या प्रचंड नाण्याची किंमत ठरवून हवे ते नाणे त्या मूल्याप्रमाणे बदलून देत असत.[9]

पेशवे सरकार काही विशिष्ट प्रकारची नाणीच स्वीकारीत असत. उदा. चांदवड, पोतेचाल, अंकुशी इ. जे चलन खजिन्यात स्वीकारले जात त्यास पोते चाल म्हणत. वापरलेली नाणी वितळवून नवीन नाणी किंवा दागिने या मौल्यवान धातूपासून बनवित असत. ही सगळी प्रक्रिया सावकारांसाठी अत्यंत फायदेशीर होती. त्यांना बट्टा मिळत असे. नवीन नावे किंवा दागिने बनविण्याकरीता दलाली असे. अनेकदा नाणी विकत घेत असे व देत असे.[10] सरकार जाणते अजाणतेपणे चलन विनिमयाच्या उत्तेजन देत होते. लष्कराचे पगार रोख स्वरूपात करण्यासाठी सावकाराकडून कर्ज म्हणून घेतली जात होती. हा कमिशनचा व्यवसाय सावकारांनी अंगीकारला होता. प्रत्येक सावकार नाण्याच्या मूल्यनिर्धारणासाठी सराफाची नेमणूक करीत असे. सरकार चलनावर निरीक्षक म्हणून पोतदाराची नेमणूक करीत असे. नाण्याच्या पिशव्या एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी वाहून नेण्यासाठी सावकार वाहतुकीची व्यवस्था करीत होते. या कामासाठी दलालीच्या तत्त्वावर पथकांची नेमणूक केली जात होती व त्यांना ठराविक प्रमाणात संरक्षणासाठी लष्कर पुरविले जात होते.[11]


1)चिटणीस कृ.ना. — 'मध्ययुगीन भारतीय संकल्पना व संस्था' भाग –4, पृ. क्र. 52

2)तत्रैव

3)तत्रैव — पृ. क्र. 54

4)डॉ. सरदेसाई, बी.एन. — 'मराठयांचा सामाजिक, आर्थिक व सांस्कृतिक इतिहास' फडके प्रकाशन, कोल्हापूर, प्र. आ. 2001, पृ. क्र. 187

5)चिटणीस, कृ.ना. — 'मध्ययुगीन भारतीय संकल्पना व संस्था' भाग –4, पृ. क्र. 55, 56

6)डॉ. सरदेसाई, बी.एन. — 'मराठयांचा सामाजिक, आर्थिक व सांस्कृतिक इतिहास' पृ. क्र. 188, 189

7)वाड, जी.सी. — पेशवा डायरी, खंड 8 ले. 1112 पृ. क्र. 257

8)Kulkarni, G.T. — 'Banking 18th Century A Case Study' Arthvijan, Pune 1973, P. 180 Vol. 15, 1935, P. 69

9)पेशवे दप्तर — खंड –23, पत्र क्र. 79

10)पुराभिलेख पुणे — घडणी दप्तर 458

11)पेशवे दप्तर — खंड –22, पत्र क्र. 67

12)पुराभिलेख पुणे — घडणी दप्तर 448

# Publish Research Article
# International Level Multidisciplinary Research Journal
# For All Subjects

Dear Sir/Mam,

We invite unpublished Research Paper,Summary of Research Project,Theses,Books and Books Review for publication,you will be pleased to know that our journals are

## Associated and Indexed,India

- Directory Of Research Journal Indexing
- International Scientific Journal Consortium Scientific
- OPEN J-GATE

## Associated and Indexed,USA

- DOAJ
- EBSCO
- Crossref DOI
- Index Copernicus
- Publication Index
- Academic Journal Database
- Contemporary Research Index
- Academic Paper Databse
- Digital Journals Database
- Current Index to Scholarly Journals
- Elite Scientific Journal Archive
- Directory Of Academic Resources
- Scholar Journal Index
- Recent Science Index
- Scientific Resources Database

Review Of Research Journal
258/34 Raviwar Peth Solapur-413005,Maharashtra
Contact-9595359435
E-Mail-ayisrj@yahoo.in/ayisrj2011@gmail.com
Website : www.ror.isrj.org